admn16-17


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com | दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

वेबसाईट : www.mcaer.org | फॅक्स (०२०) २५५३ ७६६४.


जा.क्र:मकृप/शिक्षण-१/२६१६/2088 दिनांक 20 ऑगस्ट,२०१६

## परिपत्रक

विषय:- सन २०१६-१७ या वर्षाच्या कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा भरण्याबाबत.

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षामधील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाची प्रवेश प्रक्रिया नियोजित वेळापत्रकानुसार दि. १४ ऑगस्ट,२०१६ रोजी पूर्ण झाली. तथापि, सदरील अभ्यासक्रमामध्ये मोठया प्रमाणात जागा रिक्त आहेत. ही बाब विचारात घेता, नवीन प्रवेश अर्ज मागवून गुणवत्तेनुसार प्रत्येक विद्यालयस्तरावर रिक्त जागा भरण्यास मंजुरी मिळण्याबाबत कृषी परिषद कार्यालयाकडे प्रस्ताव प्राप्त झाला होता.

यास्तव कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमास प्रवेशोच्छुक उमेदवारांना या परिपत्रकाद्वारे प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | संकेतस्थळावर अर्जाची उपलब्धता | २४/८/२०१६ |
| २. | संपूर्ण भरलेले अर्ज संबंधित विद्यालयाकडे सादर करण्याचा अंतिम दिनांक | २७/८/२०१६ |
| ३. | संबंधित विद्यालयस्तरावर अर्जाची छाननी करणे | २८/८/२०१६ |
| ४. | संबंधित विद्यालयस्तरावर गुणवत्ता यादीची प्रसिध्दी | २९/८/२०१६ |
| ५. | कृषी तंत्र विद्यालय / निकेतनांनी विद्यार्थी गुणवत्ता यादी व विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे त्या त्या जिल्हयातील घटक / संलग्न विद्यालयांच्या प्राचार्यांकडून तपासून घेणे | ३०/८/२०१६ व ३१/८/२०१६ |
| ६. | गुणवत्ता यादीस विद्यापीठाची मान्यता घेणे | ३/९/२०१६ व ४/९/२०१६ |
| ७. | विद्यापीठाने मान्यता दिलेल्या यादीनुसार विद्यार्थ्यांनी कृषी तंत्र विद्यालय / निकेतन येथे प्रवेश घेऊन हजर होण्याचा दिनांक | ६/९/२०१६ |

Pl. forward to ADF Dufulwade DL(3)

20/8

admn16-17

गुणवत्ता यादीबाहेरील उमेदवारांना प्रवेश दिल्यास अशा उमेदवारांकडून प्रवेश अर्ज भरून घेऊन प्रती उमेदवार प्रवेश अर्ज शुल्क (आरक्षित उमेदवारांसाठी रू.२००/- व अनारक्षित उमेदवारांसाठी रू.४००/-) घेऊन एकत्रित रक्कम विद्यालयाने संबंधित कृषी विद्यापीठाकडे नियंत्रक यांच्या नावाने धनाकर्षाद्वारे जमा करावी. प्रवेश अर्जाचा नमुना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**महासंचालक**

प्रति,

१. मा. कुलगुरु / कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.

२. सहयोगी अधिष्ठाता (निकृशि), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच कृषी विद्यापीठाच्या सूचना फलकांवर परिपत्रकाची प्रसिध्दी द्यावी. त्याचबरोबर आपल्या कृषी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व कृषि तंत्र विद्यालये / कृषी तंत्र निकेतन यांना त्यांच्यास्तरावर स्वखर्चाने स्थानिक वर्तमानपत्रातून प्रसिध्दी देण्याबाबत सूचित करावे.

२/- यांना असेही सूचित करण्यात येते की, विद्यालयांनी प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवर्ग, गुण, जिल्हा इत्यादी माहितीचा समावेश असलेली विद्यालयनिहाय यादी कृषी परिषदेस सादर करावी.

३. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी तंत्र पदविका, कृषी तंत्रज्ञान पदविका (Agriculture Polytechnic) व मत्स्य अभियांत्रिकी पदविका पदवी अभ्यासक्रमाच्या वरील प्रवेश कार्यपध्दतीविषयी सर्व विद्यालयांना तसेच प्रवेशोच्छुकांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदरचे परिपत्रक व प्रवेश अर्जाचा नमुना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावा.

४. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, ई-१४, वर्ल्ड ऑफ मदर कॉम्प्लेक्स, जय गणेश व्हिजन, आकुर्डी, पुणे ४११ ०३५.

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक प्रसिध्द करण्यात यावे.